अनुसूचित जातीच्या मुलामुलींना शिक्षणा साठी <u>परदेशी शिष्यवृत्ती योजना.</u>
सन २०१९-२०२० करीता पात्र विद्यार्थ्याची परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पशियो-२०१९/प्र.क्र. २५६/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २३ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि., क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दिनांक २७ जून, २०१७
२) शासन शुध्दीपत्रक, सा.न्या.व वि.स.वि., क्र.इबीसी-२०१७/प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दिनांक १ जुलै, २०१७
३) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि., क्र.इबीसी-२०१६/प्र.क्र.४२६/शिक्षण-१, दिनांक ३० जुन, २०१८
४) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/पर.शिष्य/तरतुद आहंरित/ २०१९-२०/का-४इ/११२५, दि.२०.५.२०१९ व क्र. सकआ/ शिक्षण/ पर.शिष्य/निवड समिती बै.इति./२०१९-२०/का-४इ/१७३८, दि. २०.५.२०१९

प्रस्तावना :-

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात नामांकित शिक्षण संस्थेत शिक्षणाची संधी मिळावी याकरीता सन २००३ पासून परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. सदर योजनेच्या नियमावलीमध्ये कालानुरुप वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या असुन, संदर्भीय दिनांक २७ जून,२०१७ च्या शासन निर्णयान्वये या योजनेची सुधारीत नियमावली विहीत करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचे विद्यार्थी पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी ३०० क्यूएस वर्ल्ड रॅन्कींगच्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा एकूण ७५ विद्यार्थ्यांची योजनेंतर्गत निवड करण्यात येवून, त्यांना परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यानुसार सन २०१९-२० या वर्षाकरीता परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांना परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत संदर्भीय दिनांक २७ जुन, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सचिव, सामाजिक न्याय व विशेष यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार निवड केलेल्या प्रपत्र-“अ-१”, “अ-२”, “अ-३”, “अ-४”, “अ-५”, “ब-१” आणि “ब-२” मधील एकूण ५२ विद्यार्थ्यांना संबंधित परदेशातील विद्यापीठातील उच्च शिक्षणासाठी या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे.

२. परदेश शिष्यवृत्ती साठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी या शासन निर्णयान्वये परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडुन शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली हमीपत्रे घेवुन तसेच विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रांची तपासणी करुनच संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्यांना शासन निर्णयात नमूद अभ्यासक्रम व कालावधीसाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे तसेच विद्यार्थ्यांचे परदेशातील शिक्षण चालु असल्याच्या कालावधीत एखाद्या विद्यापीठाच्या शिक्षण शुल्कामध्ये वाढ किंवा घट होत असल्यास, त्यानुसार देय शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

३. ज्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत परदेश शिष्यवृत्ती मंजूर केली आहे, त्या विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण संपल्यानंतर देशाची सेवा करणे व त्यांच्या ज्ञानाचा फायदा देशाला करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती मंजूर करण्यापूर्वी हमीपत्र (BOND) लिहून घेणे बंधनकारक राहील.

४. परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांने परदेशातील पद्व्युत्तर पदवी किंवा पीएचडी अभ्यासक्रम विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यास मुदतवाढ वा वाढीव खर्च दिला जाणार नाही.

५. परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या संबंधित विद्यार्थ्यास उच्च शिक्षण घेण्यासाठी ज्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठात अथवा अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे, ते ठिकाण वा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने परस्पर बदलल्यास संबंधित विद्यार्थ्यां कडुन शिष्यवृत्तीची रक्कम संपूर्णत: वसूल करण्यात येईल.

६. (अ) शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या एकूण खर्चाच्या रकमेपैकी ज्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाची अथवा ज्यांना द्वितीय वर्षाची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे, त्यांना त्या वर्षाचे शुल्क, निर्वाह भत्ता व इतर अनुषंगिक खर्च यांची रक्कम आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित विद्यापीठाकडून प्रमाणित माहिती प्राप्त करुन घेऊन, शिक्षण फी संबंधित विद्यापीठास आणि निर्वाह भत्ता व अनुषंगिक खर्चाची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावी.

(ब) त्या नंतरच्या वर्षाचे सत्रनिहाय शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता व इतर अनुषंगिक खर्च याबाबत विद्यापीठाकडून प्रमाणित माहिती, उपस्थिती आणि विद्यार्थ्याचा समाधानकारक शैक्षणिक प्रगती अहवाल प्राप्त करुन त्यानुसार आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी शासन निर्णयाप्रमाणे संबंधित वर्षाची अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम वरील परिच्छेद ६ (अ) नुसार अदा करावी.

(क) या करीता, आयुक्तालयाच्या संदर्भीय दिनांक २०.५.२०१९ रोजीच्या प्रस्तावानुसार योजनेखालील तरतुद आयुक्तालयस्तरावर आहंरित करण्यास व आहंरित केलेल्या तरतुदीतुन विद्यार्थ्यांची व विद्यापीठाची देय रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. याबाबत होणारा खर्च हा "मागणी क्रमांक एन-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ - अनुसूचित जातीचे कल्याण, २७७, शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (वि.घ.यो.), (०४) (२३), विदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षि शाहू महाराज शिष्यवृत्ती, (२२२५ ३८३ २), ३४ शिष्यवृत्त्या / विद्यावेतन" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्या अंतर्गत चालू आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा. त्याकरीता आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करताना शासन निर्णय क्रमांक इबीसी-२०१७ /प्र.क्र.२८८ /शिक्षण-१, दिनांक २७ जून, २०१७, शासन शुध्दीपत्रक क्रमांक इबीसी-२०१७ /प्र.क्र.२८८ /शिक्षण-१, दिनांक १ जुलै, २०१७ व शासन निर्णय क्रमांक इबीसी-२०१६/प्र.क्र.४२६/शिक्षण-१, दिनांक ३० जुन, २०१८ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०८२३१६४२०७६४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant haridas Wade

Digitally signed by Chandrakant haridas Wade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justic and S. A., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, cn=Chandrakant haridas Wade
Date: 2019.08.23 16:53:03 +05'30'

(चंद्रकांत ह.वडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई
८. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
१२. संबंधीत विद्यार्थी (समाजकल्याण आयुक्तालय, पुणे मार्फत).
१३. उपसचिव (अर्थसंकल्प)/(विघयो), सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
१४. सहसचिव/अवर सचिव (शिक्षण-१), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१५. निवडनस्ती (का.शिक्षण-१)

(शासन निर्णय क्र.सा.न्या.व वि.स.वि., क्र.पशियो-२०१९/प्र.क्र.२५६/शिक्षण-१, दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ चे सहपत्र)

सन २०१९-२० करीता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्ती -निवड यादी

प्रपत्र-अ-१

पदव्युत्तर पदवी - कला (PG - Arts)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१९	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
१	नुपूर गुलाबराव वाघ	The London School of Economics and Political Science (LSE)	UK	३८	PG	M.SC In Social Anthrology	१ वर्ष

प्रपत्र-अ-२

पदव्युत्तर पदवी - वैद्यकीय (PG - Medical)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१८	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
२	विजया राजेंद्र दणके	University of Bristol	UK	५१	PG	MSC Oral Medicine	१ वर्ष
३	शिशिर भरत मेश्राम	University of Nottingham	UK	८२	PG	MSc Sports And Exercise Medicine	१ वर्ष
४	अभिजित युवराज हुमणे	University of Nottingham	UK	८२	PG	MSC Oncology	१ वर्ष
५	सिग्मा सुरेश मून	The University of Western Australia	Australia	९१	PG	Master Of Exercise Science	२ वर्ष

प्रपत्र-अ-३

पदव्युत्तर पदवी - विज्ञान (PG - Science)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१८	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
६	नीरजा बाळू चोपडे	Yale University	US	१५	PG	Environmental management	२ वर्ष
७	प्रिया रघुनंदन बुकटे	The University of Melbourne	Australia	३९	PG	Master of Landscape Architecture	३ वर्ष

८	शुभम बबन खंडारे	University of Leeds	UK	९३	PG	Msc Food Science (Food Biotechnology)	१ वर्ष
९	ओम उदयकुमार शिखरे	Queen Mary University of London	UK	११९	PG	MSc FT Big Data Science with Industrial Experience	२ वर्ष

प्रपत्र-अ-४

पदव्युत्तर पदवी - अभियांत्रिकी (PG - Engineering)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१८	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
१०	संज्योत दीपक थिटे	University of Michigan Dearborn	US	२०	PG	M.S In Data Science (Computer Engineering)	२ वर्ष
११	अंकिता अरुण हूमने	EPFL - Ecole Polytechnique Federale de Lausanne	Switzerland	२२	PG	Master in Robotics	२ वर्ष
१२	यश जयंत चहांदे	University of Toronto	Canada	२८	PG	M.Engg.in Cities Engineering and Management	२ वर्ष
१३	सिद्धी सुनील भोसले	King's College London	UK	३१	PG	Msc in Cyber Security	१ वर्ष
१४	पियुष प्रेमचंद कलकुटे	Northwestern University	US	३४	PG	M.S. Computer Science	१५ महिने
१५	अलिशा अजय शेवाळे	The University of Melbourne	Australia	३९	PG	Master Of Information Technology	२ वर्ष
१६	सुदर्शन भगवान खंदारे	The University of Melbourne	Australia	३९	PG	Master Of Information System	२ वर्ष
१७	निखिल शेषराव रामटेके	The University of Sydney	Australia	४२	PG	Masters of Professional Engineering (Civil)	२ वर्ष
१८	जुही भीमराव दखने	The University of Sydney	Australia	४२	PG	Master of Information Technology	१.५ वर्ष

१९	प्रणय शेखर बनकर	The University of Sydney	Australia	४२	PG	Master Of Engineering (Sustainability and Enviromental Engineering)	१.५ वर्ष
२०	आदित्य शेखर साळवे	New York University (NYU)	US	४३	PG	Master's in Construction Management	२ वर्ष
२१	अक्षय सुभाष बागडे	New York University (NYU)	US	४३	PG	Master in Civil Engineering	२ वर्ष
२२	क्षितीज प्रदीप गायकवाड	New York University (NYU)	US	४३	PG	MSc Mechatronics and Robotics	२ वर्ष
२३	प्रभाकर मोरेश्वर खोब्रागडे	The University of New South Wales (UNSW Sydney)	Australia	४५	PG	Engineering Science (Master In Tele communication)	२ वर्ष
२४	रोहित उद्धव बनसोड	The University of New South Wales (UNSW Sydney)	Australia	४५	PG	Master in Environmental Engineering	२ वर्ष
२५	प्रशांत रुपचंद दहाट	The University of New South Wales (UNSW Sydney)	Australia	४५	PG	Master of Mechanical Engineering	२ वर्ष
२६	सिद्धार्थ गणपती सातपुते	The University of New South Wales (UNSW Sydney)	Australia	४५	PG	Master Of Civil Engg	२ वर्ष
२७	शंतनू सुभाष इंगळे	The University of Queensland	Australia	४८	PG	Master Of Engineering Science (Management)	२ वर्ष
२८	अथर्व अनिल शिंदे	The University of Warwick	UK	५४	PG	Manufacturing System Engineering Management	१ वर्ष
२९	अश्विनी अनिलकुमार बनसोड	The University of Warwick	UK	५४	PG	MS Business Analytlcs	१ वर्ष

३०	मीनाक्षी यशवंत साळवे	Monash University	Australia	५९	PG	Master Of Data Science	२ वर्ष
३१	शुभम मुकुंद भोसले	Monash University	Australia	५९	PG	Master Of Data Science	२ वर्ष
३२	स्वप्नील चित्तरंजन चौरे	Monash University	Australia	५९	PG	Master Of Information Technology	२ वर्ष
३३	इशा अनिल नीतनवरे	University of Glasgow	UK	६९	PG	M.S. Biotechnology	१ वर्ष
३४	श्रीहर्ष लक्ष्मण शेंद्रे	The University of Sheffield	UK	७५	PG	MSC Master Of Science Data Analytics	१ वर्ष
३५	प्रथमेश विक्रम घोलप	The University of Sheffield	UK	७५	PG	MSc Mechanical Enginering and Industrial Management	१ वर्ष
३६	राहुल महेंद्र वासनिक	The University of Sheffield	UK	७५	PG	MSC Data Analytics	१ वर्ष
३७	रुक्मिणी रमेश खोब्रागडे	The University of Sheffield	UK	७५	PG	M.SC (Civil Engineering)	१ वर्ष
३८	चेतन सुरेश बोरकर	University of Birmingham	UK	७९	PG	MSC Advanced Computer Science	१ वर्ष
३९	प्रांजल सुरेश मेश्राम	University of Birmingham	UK	७९	PG	M.Sc Advanced Chemical Engineering	१ वर्ष

प्रपत्र-अ-५

पदव्युत्तर पदवी - व्यवस्थापन (PG - Management)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१८	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
४०	शैली धीरज पाटील	Cornell University	US	१४	PG	Master of Professional Studies in Real Estate	२ वर्ष
४१	विशाल पोपट घाईतडक	The University of Melbourne	Australia	३९	PG	Master OF Managment (Human Resources)	२ वर्ष

४२	पूजा यशवंत मानखेडकर	The University of Melbourne	Australia	३९	PG	Master of Mangment (Finance)	२ वर्ष
४३	कोशिका सिद्धार्थ कांबळे	The University of New South Wales (UNSW Sydney)	Australia	४५	PG	Master Of International Business	२ वर्ष
४४	किरण किसन चंदेलिया	The University of Queensland	Australia	४८	PG	Master Of Business (Marketing)	२ वर्ष
४५	अश्वजीत माणिकराव साबळे	Monash University	Australia	५९	PG	Master of Business	२ वर्ष
४६	सुशील रामचंद्र सूर्यवंशी	The University of Western Australia	Australia	९१	PG	Master Of Commerce In Management	२ वर्ष
४७	आकांक्षा प्रमोद मानवाटकर	The University of Adelaide	Australia	११४	PG	Master Of Globel Food and Agricultural Business	२ वर्ष

प्रपत्र-ब-१

पीएचडी - विज्ञान (PhD - Science)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१८	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
४८	भाग्यश्री देविदास पगारे	The University of Warwick	UK	५४	PhD	PhD Physics	४ वर्ष

प्रपत्र-ब-२

पीएचडी - अभियांत्रिकी (PhD - Engineering)

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्या पीठाच्या देशाचे नाव	QS World Ranking २०१८	अभ्यास क्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यास क्रम कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
४९	प्रवीण सुरेश कांबळे	The University of Manchester	UK	२९	PhD	PhD In Mechanical Engineering	३ वर्ष
५०	सुमित मोरेश्वर मेश्राम	Delft University of Technology	Netherlands	५२	PhD	Phd in Water Resources	४ वर्ष

५१	विनोद एकनाथ सातपुते	Newcastle University	UK	१४१	PhD	PhD Mechanical Engineering	३ वर्ष
५२	गौरव मोहन साखरे	University of Otago	New Zealand	१७५	PhD	Clinical Biomechanics	३.५ वर्ष